**शालेय पोषण आहार योजनेचे सन २००७-०८ मधील अखर्चित अनुदान सन २००८-०९ मध्ये खर्च करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

शासन निर्णय क्रमांक: शापोआ- २००८/प्र.क्र.४६७/प्राशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक:- ८ ऑक्टोबर, २००८.

वाचावे:- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/ अर्थोपाय, दि.६ जून २००८

२) आपले क्र.शापोआ २००७-०८/अखर्चित/प्राशिसं ३०१/४५३७, दि.२८/८/२००८ चे पत्र.

केंद्र शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेतंर्गत अन्न शिजवून देणे, भांडे खरेदी करणे, व्यवस्थापन / सनियंत्रण व मूल्यामापन करणे इत्यादी प्रयोजनासाठी सन २००७-०८ मध्ये निधी वितरीत करण्यात आला होता. सदर निधीपैकी रु.१६५२.१२ लक्ष निधी अखर्चित राहीलेला आहे. सदर अखर्चित निधी खालील अटींच्या अधिन राहून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर निधी जिल्हा परिषद. महानगरपालिका यांचेकडे त्यांच्या खात्यावर जमा झालेला असावा.

२) सदर निधी खर्च करण्यासाठी शालेय पोषण अहार योजनेच्या सेवा सन २००७-०८ मध्ये पुरविण्यात आलेल्या असाव्यात.

३) सदर अखर्चित निधी सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये खर्च करण्याची अनुमती राहील, त्यानंतर मात्र शासनाकडे परत करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संगणक संकेतांक क्र. २००८१०१०१२०६५४००१

( प्रकाश साबळे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे.

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.

सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.

नियोजन विभाग/वित्त विभाग (व्यय-५/अर्थ-१)

शालेय शिक्षण विभाग (अर्थसंकल्प)

निवड नस्ती- कार्यासन- प्राशि-४